सत्यं शिवं सुंदरम्                                        दिनांक:- ७-३-२००५

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर.

एम.ए. व्दितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष २००४-२००५

**'अभिप्राय'**



प्रति,

प्रा.म.ई.तंगावार

मराठी विभाग

"गुरु ब्रह्मा गुरु विष्णु गुरु देवो महेश्वरा
गुरु साक्षात परब्रह्मा तस्मै श्री गुरुवे नम: ॥"

गुरु हा देवापेक्षाही श्रेष्ठ आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामागे गुरुचा हात असतो. गुरु आणि शिष्य यांचे अतूट नाते असते. आई ~~[illegible]~~ वडील व गुरु हे तीन उत्तम शिक्षक असतात त्यांच्या-मुळेच मनुष्य ज्ञानवान बनतो.

सर, जेव्हा मी या हावगीस्वामी महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा मला अशी जाणीव झाली की येथील प्राध्यापक अनुभवी नसतील पण जेव्हा प्रत्यक्ष तासिका झाल्या तेव्हा मला असा अनुभव आला की ते मार्गदर्शन अनुभवी प्राध्यापकापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ होते. म्हणून मला वाटते, 'अनुभव हा मोठा विचित्र शिक्षक आहे, तो प्रथम परीक्षा घेतो व नंतर शिकवतो.'

सर, तुमच्याविषयी बोलावयाचे झाले तर त्यासाठी शब्द अपूरे पडतील. सर्वप्रथम सांगायचे झाले तर आपला स्वभाव हा अतिशय मनमिळावू, उदारवृत्ती, प्रेमळपणा, आपुलकी, नि:संकोचपणा, मुलाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन हे तुमच्या स्वभावाची वैशिष्ट्य आहेत. सर, तुमची शिकवण्याची शैली ही अतिशय सोपी आहे. इतर प्राध्यापकापेक्षा आपली अध्ययनशैली, लेखनपद्धती सोपी व सुटसुटीत आहे.

सर तुमचे राहणीमान अतिशय साधे आहे, तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला समजून घेणे शिवाय त्यांना पुस्तकाची मदत करुन देता व त्यांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करता.

कृपया मागे पहा.

सर,
सर्वात महत्वाचे म्हणजे तुम्ही वीरशैव समाजासाठी व्याख्यान व वृत्तपत्रात लेख देता हे तुमचे महान कार्य आहे. यामुळे मला तुमचा अभिमान वाटतो.

तुमच्यामध्ये सांगायसारखा दोष एकही नाही. तुमच्यात फक्त गुणांचा साठा आहे. त्यामुळे तुमच्या-सारखे गुरु भेटले हे मी माझे भाग्य समजतो. शेवटी ईश्वराजवळ एकच मागणे मागतो की, आपला भविष्यकाळ हा उज्वल, भरभराटीचा, संपन्नतेचा जावा.





आपला आज्ञाधारक
स्वाक्षरी – Sandeep
विद्यार्थ्यांचे नाव – कोरे संदीप बाबुराव
पूर्ण पत्ता – मु.पो. हंडरगुळी
ता. उदगीर
जि. लातूर